**रजिष्टर पोष्टाद्वारे**

**शिक्षण सेवक (प्रशिक्षित) या पदावर**
**नियुक्ती देणेबाबत (उर्दू माध्यम)**
**उच्च प्राथमिक स्तर (इ.6 वी ते 8 वी)**

जिल्हा परिषद अहिल्यानगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद आदेश क्रं.कार्या-1/पीई-1/ 310 /2026
अहिल्यानगर, दिनांक. डिजिटल स्वाक्षरीखाली नमुद प्रमाणे

**वाचा :-**

1) ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.जेपीटी 1480/19667/3444/12, दिनांक 14 मे 1986
2) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एसएसएन-1099/(340/99) / माशि-2, दि. 13 ऑक्टोबर 2000
3) महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/प्र.क्र.415/का-2, दि. 25 मे 2001
4) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पीआरई/2002/(3395)/प्राशि-1, दिनांक 27 फेब्रुवारी 2003
5) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39, दि. 19 मार्च 2003
6) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.भूकंप-1009/प्र.क्र.207/2009/16-अ, दि. 27 ऑगस्ट 2009
7) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पअंक-1009/प्र.क्र.200/2009/16-अ, दि.27 ऑक्टोबर 2009
8) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक सीबीसी-10/2010/प्र.क्र.47/मावक/5 दि.26 मार्च, 2010
9) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीबीसी 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दि.12/12/2011
10) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.पीआरई-1713/(86/13)/प्राशि-5, दि.19 जुन 2013
11) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2015/प्र.क्र.404/का-12 दि.25 एप्रिल 2016
12) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दि.1 जुलै 2016
13) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्र.वेतन1216/प्र.क्र.123/16/टिएनटी-3 दि.13ऑक्टोबर2016
14) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-2015/प्र.क्र.62/वित्त-5 दि. 13 जून 2017
15) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.311/टीएनटी-1 दि. 01 जानेवारी 2019
16) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.सीईटी -2015/प्र.क्र.149/टीएनटी-1दि. 07 फेब्रु. 2019
17) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.397/टीएनटी-1, दि. 07 फेब्रुवारी 2019
18) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.397/टीएनटी-1, दि. 25 फेब्रुवारी, 2019
19) ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.जिपब 4819/प्र.क्र.201/आस्था-14, दि.25 फेब्रुवारी 2019
20) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-2018/प्र.क्र.397/ टीएनटी-1 दि. 16 मे 2019
21) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग 2018/प्र.क्र.114/16-अ, दि.19 मे 2019
22) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.397/ टीएनटी-1दि. 12 जुन 2019
23) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण 1716/प्र.क्र.18/क्रीयुसे-2,दि.30 जुन 2022
24) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2022/प्र.क्र.106,टिएनटी-1,दि.10 नोव्हे. 2022
25) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2020/प्र.क्र.260,टिएनटी-1,दि.7 फेब्रु. 2023
26) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सनिव 2023/प्र.क्र.14/कार्या12,दि. 3 मार्च 2023
27) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अमुजा-2022/प्र.क्र.122/का-3,दि. 6 एप्रिल 2023
28) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.174,टिएनटी-1,दि.21 जुन 2023
29) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन पत्र क्र.संकीर्ण-2020/प्र.क्र.223,टिएनटी-1,दि.10 जुलै 2023
30) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन पत्र क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.509,टिएनटी-1,दि.13 ऑक्टोबर 2023
31) मा.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र.प्राथ.106/पदभरती/पवित्र पोर्टल/2024/692, दि.28 जानेवारी, 2024
32) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पीआरई 2001/(2899/2001)/प्राशि-1, दि. 06/08/2001

Scanned by CamScanner

33) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एसएसएन 1000/(361/2001)/माशि-2, दि. 10/12/2001
34) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन पत्र क्र.संकिर्ण-2024/प्र.क्र.196/टिएनटि-1, दि. 14/03/2024
35) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र.आस्था-क/प्राथ.106/पदभरती/2024/1408, दि.25 फेब्रुवारी, 2024
36) मा.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र.आस्था-क/प्राथ-106/ पदभरती-उर्दू-रु.फे./2024/4653, दि. 30/07/2024
37) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद रिट याचिका क्र.9611/2024 चा निकाल दि. 06/09/202
38) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र.आस्था-अ/प्राथ-106/ टिईटी गैरप्रकार/चारित्र्य तपासणी/2024/6498, दि. 24/10/2024
39) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण2024/प्र.क्र.03/ टिएनटि-1, दि.11/10/2024
40) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र चापअ1012/प्र.क्र.63/16-अ दि. 26/08/2014
41) जिल्हा स्तरावरील गट क व गट ड च्या पदाकरिता उमेदवारांच्या संदर्भात स्थापन समिती सभा इतिवृत्त दि. 13/11/2025
42) या कार्यालयाकडील पत्र क्र. कार्या-1/पीई-1/ 1016 /2025 दिनांक 16/12/2025
43) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग मुंबई यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण-1526/प्र.क्र.30/ आस्था-14 दिनांक 28 फेब्रुवारी 2026

## - : नियुक्ती पत्र :-

आपणास कळविणेत येते की, आपली शिक्षण सेवक म्हणून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत खालील नमूद केलेल्या शाळेमध्ये पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | शिकविण्याचे माध्यम | विषय | निवडीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | पदस्थापनेचे ठिकाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शाळा | तालुका |
| 1 | श्री. शेख अब्दुल माजेद अब्दुल गनी, | उर्दू | गणित-विज्ञान | खुला | सर्वसाधारण | सलाबतपुर उर्दू | नेवासा |

**नेमणुकीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

1) शिक्षण सेवक म्हणून आपली नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधीन असेल. त्या अटी व शर्ती मान्य असल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र आपण लिहून दिल्यानंतरच आपणांस शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती दिली जाईल.
2) सदरची नियुक्ती मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद रिट याचिका क्र.1396/2025 संदर्भातील दिनांक 08/05/2025 चे निकालानुसार महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा गैरप्रकारात समाविष्ट उमेदवारांसंदर्भात सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर, पुणे येथील गुन्हा रजि नंबर 56/2021 व 58/2021 या गुन्ह्याच्या तपासाच्या आणि त्यानंतरच्या खटल्याच्या अंतिम निकालाचे अधिन राहून पदस्थापना स्विकारत असलेबाबत उमेदवाराने हमीपत्र सादर करण्याचे अटीवर देण्यात येत आहे.
3) तसेच सदरची नियुक्ती मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथिल रिट याचिका क्र.2534/2024, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथिल रिट याचिका क्र.2752/2024 व 2784/2024 तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद व नागपूर येथील दाखल अन्य याचिकेतील निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.
4) उमेदवाराने पवित्र पोर्टलवर स्व-प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती सत्य गृहीत धरून आपणास नियुक्ती देण्यात येत आहे. तथापि स्व-प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती खोटी अथवा विसंगत आढळल्यास कोणत्याही टप्प्यावर आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.
5) सदर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून पदस्थापनेच्या ठिकाणी 30 दिवसांचे आत हजर होणे आपणास बंधनकारक राहील अन्यथा आपणास सेवेची आवश्यकता नाही असे समजून सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.
6) शिक्षण सेवक म्हणून नियुक्तीचा कालावधी 3 वर्षे इतका राहील. तसेच शिक्षण सेवकांना दिर्घ सुट्टीसह पूर्ण शैक्षणिक वर्षातील 12 महिन्याचे मानधन अनुज्ञेय राहील.

Scanned by CamScanner

7) शिक्षण सेवकाला सेवेत सामावून घेण्यासाठी शिक्षण सेवक या पदावर 3 शैक्षणिक वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवाराला प्राथमिक शिक्षकांच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात येईल.
8) शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.पीआरई-2002/3395/प्राशि-1, दि. 27 फेब्रुवारी, 2003, जोडपत्र-अ मधील परिच्छेद 14 अन्वये अनुज्ञेय धरलेला अनुपस्थितीचा कालावधी वगळता अन्य अनुपस्थितीचा कालावधी कर्तव्यार्थ कालावधी म्हणून गणला जाणार नाही.
9) शिक्षण सेवक म्हणून आपणास अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या कोणत्याही प्राथमिक शाळेत काम करावे लागेल.
10) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरूपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.
11) नियमित स्वरूपात नियुक्ती केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुविधा आपणास देय असणार नाही.
12) आपणास राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिन्याची नोटीस द्यावी लागेल राजीनामा दिल्यास अथवा मध्येच नोकरी सोडून दिल्यास मागील सेवेचा फायदा 3 वर्षाचा कालावधी परिगणीत करताना मिळणार नाही.
13) प्रशिक्षित शिक्षण सेवक म्हणून आपणास दरमहा रूपये 16,000/- एवढे मानधन दिले जाईल.
14) नियुक्तीच्या कालावधीत आपणास खालील कर्तव्य पार पाडावी लागतील.
a) संबंधित गावातील शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करून घेण्याच्या तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविण्याच्या दृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे.
b) शाळेमध्ये दररोज संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे.
c) अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे.
d) नेमून दिलेल्या वर्गाचे विहित कार्यपध्दतीनुसार अध्यापन करणे.
e) शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहणे.
f) शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक बाबीबाबत त्याच्या आदेशाचे पालन करणे.
g) वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन करणे.
h) शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या (क्रीडास्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी) आयोजनामध्ये सहभागी होणे.
15) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयाकडून आपले डी.एड. चे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र, टी.ई.टी./ सी.टी.ई.टी. प्रमाणपत्र यांची पडताळणी करून ते वैध असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपली नियुक्ती पुढे चालू राहील. अन्यथा आपली सेवा समाप्त करण्यात येईल.
16) शिक्षण सेवक पदावर रुजू झालेच्या दिनांकापासून दोन महिन्याचे आत जिल्हा शल्य चिकित्सक, अहिल्यानगर यांचेकडील शारिरिक दृष्टया पात्रते संबंधीचे वैद्यकीय प्रमाणपत्र नेमणुकीचे कार्यालयास सादर करणेत यावे.
17) सदरची नियुक्ती सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.चारित्र्य-2117/प्र.क्र.483/2017/16-अ, दि. 28 ऑगष्ट, 2017 अन्वये शासन सेवेत नेमणूक करताना उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य आल्याचे आढळून आल्यास तात्पुरते नियुक्तीपत्र रद्दबादल करून शासन सेवेत कायमस्वरूपी अपात्र ठरविण्यात येईल या अटीवर चारित्र पडताळणीचे अधिन राहून देण्यात येत आहे. कार्यालय प्रमुख यांनी सदर उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दोन महिन्यांचे आत प्राप्त करुन घ्यावेत व त्याची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. यामध्ये एखादी गंभीर बाब केव्हाही निदर्शनास आल्यास कोणतेही कारण न देता सेवा समाप्त करण्यात येईल.
18) जिल्हा परिषदेच्या सेवेत रुजू होण्यापूर्वी भारतीय संविधानास एकनिष्ठ राहण्याची शपथ शिक्षण विस्तार अधिकारी/ मुख्याध्यापक यांचे समोर घ्यावी लागेल.
19) नेमणूकीच्या ठिकाणी हजर होणेकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.
20) आपण विवाहित असल्यास तुम्हाला एकच पती/ पत्नी आहे असे गृहित धरुन नियुक्ती देण्यात येत आहे. एकापेक्षा जास्त पती/ पत्नी असल्याचे निदर्शनास आल्यास तुमची सेवा समाप्त करण्यात येईल.
21) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम 2021 नुसार उमेदवाराने नियुक्तीचे वेळी खात्रीशीर कागदपत्री पुराव्यासह जन्म तारीख घोषीत करील. जेव्हा नियुक्तीची विहीत शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र हे वैध दस्ताऐवज असल्याचे मानण्यात येईल. अन्य बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा ज्या शाळेत तो शेवटी शिकत होता, अशा मान्यता प्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल. त्यानुसार उमेदवाराचे जन्म तारखेचे परिशिष्ठ-5 अ मध्ये हमीपत्र देईल. त्यानंतर खंड बी मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

Scanned by CamScanner

22) शिक्षण सेवक पदावर नेमणूक दिल्यानंतर शाळा/ तालुका बदलून मिळण्यासाठी कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केल्यास अथवा दबाव आणल्यास आपणास कोणतेही कारण न देता आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

23) सदर नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपणास महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रक, शासन अधिसूचना तसेच वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी देतील अशा सर्व निर्देशाचे तंतोतंत पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

24) कार्यालय प्रमुखांना खालील नामनिर्देशनपत्र देण्यात यावीत 1.वैद्यकीय दाखला, 2.जातीचा दाखला, 3.जातीचे वैधता प्रमाणपत्र, 4.स्वग्राम घोषणापत्र, 5.शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता प्रमाणपत्र मुळ सेवापुस्तक भरताना उपरोक्त कागदपत्रे डकविण्यात यावी ती डकविण्यात आली आहे किंवा नाही याची खात्री स्वत: करुन घ्यावी.

25) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्र.प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39, दि.19 मार्च 2003 नुसार संगणक अर्हता/ एम.एस.सी.आय.टी अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र नियुक्ती मिळालेपासून दोन वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यानुसार खातेप्रमुख, कार्यालय प्रमख यांनी सदर कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करावे.

26) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दि.01/07/2005 अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र) नियम 2005 नियुक्त्यासाठी अधिसूचनेत विहीत केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागू झालेली आहे. त्याअनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना-अ नुसार उमेदवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे. सदर नियमानुसार दिनांक 28/03/2005 नंतर तिसरे अपत्य असणाऱ्या उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

27) आपण मागासवर्गीय असल्यास शासन निर्णय दि.12 डिसेंबर 2011 नुसार आपणास नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत जातपडताळणी समितीकडुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

28) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.घभाम.1005/प्र.क्र.463/पापु 16, दिनांक 8 जुन, 2006 अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असलेबाबत व त्याचा वापर करीत असलेबाबत प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे.

29) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.अंनियो-2015/प्र.क्र.62/वित्त-5, दि.13 जुन 2017 अन्वये राष्ट्रीय निवृत्ती योजना लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण / जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

30) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.रानियो-2022/प्र.क्र./34/सेवा-4, दिनांक 31/03/2023 अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्ती प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुंटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान लागू होईल. त्याकरिता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसाच्या आत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

31) महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.अमुजा-2022/प्र.क्र.122/का-3,दि. 6 एप्रिल 2023 अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडुन अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करुन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

32) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.174,टिएनटी-1,दि.21 जुन, 2023 अन्वये आपणास जिल्हा बदलीचा हक्क राहणार नाही, तथापि नव्याने नियुक्तीनंतर इतर जिल्ह्यांत जाऊ इच्छिणाऱ्या शिक्षकांने रितसर राजीनामा देऊन पुन्हा विहीत प्रक्रीयेच्या माध्यमातुन आवश्यकतेनुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा देऊन त्यातील गुणवत्तेच्या आधारे पवित्र पोर्टलव्दारे शिक्षक म्हणून नियुक्ती मिळविणे आवश्यक राहील.

33) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचेकडील पत्र क्र./प्राथ.106/पदभरती/पवित्र-पोर्टल/2024/692, दि.28 जानेवारी 2024 अन्वये सेमी इंग्रजी शाळांकरीता इंग्रजी माध्यमातुन व्यावसायिक अर्हता धारण करणाऱ्या नियुक्त शिक्षण सेवकाच्या नियुक्तीनंतर शिक्षण सेवक कालावधीमध्ये त्यांची कौशल्य चाचणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अधिनस्त प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या इंग्रजी भाषेशी संबंधित संस्थेकडुन घेण्यात येणार आहे. सदर कौशल्य चाचणीतील गुणवत्तेनुसार संबंधित शिक्षण सेवकांचे कौशल्य/ ज्ञान असमाधानकारक असल्याचे आढळल्यास आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

Scanned by CamScanner

34) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.दिव्यांग 2018/प्र.क्र.114/16-अ, दि.19 मे 2019 मधील मुद्दा क्र.5 नूसार निवड प्रक्रीयेदरम्यान अथवा नियुक्तीच्या दरम्यान दिव्यांग उमेदवारांचे प्रमाणपत्राची तपासणी/ फेरतपासणी करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील अशी तरतुद आहे. त्यानुसार आपले दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीचे वैधतेचे अटीस अधिन राहुन आपणांस नियुक्ती देणेत येत आहे. आपले दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीमध्ये अवैध ठरल्यास आपली नियुक्ती कोणत्याही प्रकारची नोटीस न देता अथवा आपणास बाजु मांडण्यांची संधी न देता संपुष्टात येईल.

35) श्री.शेख अब्दुल माजेद अब्दुल गनी यांचेवर पोलिस ठाणे परतुर येथे गुरनं.460/2021 कलम 143, 147, 323, 504, 506 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हा मा.कोर्ट परतुर येथे न्यायप्रविष्ठ आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक चापअ : 1012/प्र.क्र.63/16-अ दिनांक 26/08/2014 च्या परिपत्रकातील Schedule 'A' मधील अ.क्र. 11 मध्ये नमूद केलेल्या दंगल या गुन्ह्याशी संबंधीत आहे. सदर गुन्ह्या संदर्भात खटला न्यायालयामध्ये प्रलंबित असल्याने सदर खटल्यातील न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन नियुक्ती देणेत येत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202603241600391. असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 24-03-2026 15:15:24

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.शेख अब्दुल माजेद अब्दुल गनी,
मु.पो.वरफळ, ता.परतुर, जि.जालना
imshaikhmajed@gmail.com

प्रत :- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव

1. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती - नेवासा

2/- संबधित नियुक्त शिक्षण सेवकास नियमानुसार हजर करुन घेण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी. तसेच संबंधित उमेदवारांची मुळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रांची पडताळणी आपल्या स्तरावरुन करावी व त्यानंतर संबंधित उमेदवारास हजर करुन घ्यावे व हजर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

2. गट विकास अधिकारी, पंचायत समिती - नेवासा
3. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
4. संबंधित मुख्याध्यापक
5. निवडनस्ती

Scanned by CamScanner